# राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/२२६ /२०२५ दि. ०३/१०/२०२५

**"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"**

**ज्याअर्थी,** राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक ०४/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. पासुन बंजारा समाजाचे वतीने एस.टी. प्रर्वगामधुन आरक्षण मिळावे या मागणी करीता कोर्टनाक्याकडुन पॅव्हेलियन हॉटेल समोरुन ठाणे जेलकडे जाणाऱ्या रोडवर धरणे आंदोलन करणार आहेत. सदर आंदोलन करिता मोठया प्रमाणात जनसमुदाय एकत्र येणार आहेत. सदर परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) टेंभी नाका येथुन कोर्ट नाका मार्गे पॅव्हेलियन हॉटेल मार्गे झोन १ कार्यालयासमोरुन कळवा, नवी मुंबई जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **'कोर्ट नाका चौक'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची वाहने कोर्ट नाका, पॅव्हेलियन हॉटेल येथुन उजवीकडे वळण घेवुन ठाणे पोलीस स्कुल येथुन डावेव ळण घेवुन पारीख कट मार्गे इच्छीत स्थळी जातील.
ब) सदरची वाहने कोर्टनाका येथुन डवे वळण घेवुन जी.पी.ओ. मार्गे मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**सदरची अधिसुचना दिनांक ०४/१०/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वा. पासुन संध्याकाळी १८:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदरची वाहतुक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे,

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी, वाहतूक उपविभाग ठाणे.